# सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांची अनमोल शिकवण (खंड २)

# आचरणातून आणि सूक्ष्मातून शिकवणे

## (शिकवणीचे साधकांना झालेले लाभही अंतर्भूत !)

मराठी (Marathi)


**संकलक**

हिंदु राष्ट्राच्या स्थापनेचा उद्घोष करणारे

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले**

**सहसंकलक**

**पू. संदीप गजानन आळशी**



**सनातन संस्था**




**卐 सनातनच्या ग्रंथांची भारतातील भाषांनुसार संख्या 卐**

मराठी ३४१, इंग्रजी २०१, कन्नड १९६, हिंदी १९५, गुजराती ६८, तेलुगु ४५, तमिळ ४३, बंगाली २९, मल्ल्याळम् २३, ओडिया २२, पंजाबी १३, नेपाळी ३ अन् आसामी २

**सप्टेंबर २०२३ पर्यंत ३६२ ग्रंथांच्या १३ भाषांत ९४ लाख ३५ सहस्र प्रती प्रसिद्ध !**

# ग्रंथाच्या संकलकांचा परिचय

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या आध्यात्मिक संशोधनकार्याचा संक्षिप्त परिचय



१. ‘ईश्वरप्राप्तीसाठी कला’ याविषयी मार्गदर्शन आणि संगीत, नृत्य इत्यादी कलांचे सात्त्विक सादरीकरण करण्याविषयी संशोधन

२. आचारपालनातील कृती, धार्मिक कृती आणि बुद्धीअगम्य घटना यांचे वैज्ञानिक उपकरणांद्वारे संशोधन

३. शारीरिक आणि मानसिक, तसेच वाईट शक्तींच्या त्रासांवरील उपायपद्धतींविषयी संशोधन

४. १८.१०.२०२३ पर्यंत २ बालक-संतांची, तसेच ६० टक्क्यांहून अधिक आध्यात्मिक पातळी असलेल्या २२८ अन् अन्य ९०२ दैवी बालकांची ओळख समाजाला करून दिली आहे. दैवी बालकांविषयी संशोधनही चालू आहे.

५. स्वतःचा (सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचा) देह, स्वतःच्या वापरातील वस्तू यांच्यातील दैवी पालटांविषयी संशोधन अन् स्वतःच्या महामृत्यूयोगाचा संशोधनात्मक अभ्यास

**(संपूर्ण परिचयासाठी वाचा – www.Sanatan.org)**

### सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचे साधकांना आश्वासन !

स्थूल देह असे स्थळकाळाची मर्यादा ।
कैसे असू सर्वदा सर्वां ठायी ॥
सनातन धर्म माझे नित्य रूप ।
त्या रूपे सर्वत्र आहे सदा ॥ – जयंत बाळाजी आठवले
१५.५.१९९६

## पू. संदीप गजानन आळशी यांचा परिचय



सनातनच्या ग्रंथांच्या निर्मितीची सेवा करण्यासह राष्ट्रजागृती आणि धर्मप्रसार करणारे प्रसारसाहित्य (उदा. सनातन पंचांग, धर्मशिक्षण फलक इत्यादी) यांसाठी लेखन करतात. साधना, राष्ट्र अन् धर्म यांसंबंधी नियतकालिक ‘सनातन प्रभात’मधून प्रबोधनपर लेखनही करतात.

---

## ग्रंथाची अनुक्रमणिका

(प्रकरणांतील वैशिष्ट्यपूर्ण मथळे खाली दिले आहेत.)


**प्रकरण १. सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचे आचरणातून शिकवणे ११**

१ अ. परात्पर गुरु डॉ. आठवले यांनी आई-वडिलांची आदर्श सेवा करून साधकांमध्ये मातृ-पितृ सेवेचे बीज रोवणे ११

१ इ. साधकांना दैनंदिन जीवनाशी संबंधित कृतींतून शिकवणे १३

* साधकांना आश्रमाची दैनंदिन आणि मासिक स्वच्छता करण्याची शिस्त लावणे अन् स्वतःही त्यात सहभागी होणे १५

१ ई. धर्माचरण आणि अध्यात्म यांचे श्रेष्ठत्व लक्षात आणून देणे १८

१ उ. स्वभावदोष आणि अहं यांच्या निर्मूलनाच्या संदर्भात शिकवणे २०

१ ऊ. साधकांना व्यष्टी गुण वाढवण्याच्या संदर्भात शिकवणे २१

* स्वावलंबन * व्यवस्थितपणा * काटकसरीपणा २२

* वक्तशीरपणा * वेळेचा पूर्ण वापर करणे * अखंड सेवाभाव ३०

* गुरु, गुरुपत्नी, संत अन् श्री शंकराचार्य यांच्याप्रतीचा उत्कट भाव ३७

* अहंशून्यता * ‘सर्व ईश्वरेच्छेने होते’, अशी दृढ श्रद्धा ४२

* साक्षीभाव ४६

१ ए. साधकांना समष्टी गुण वाढवण्याच्या संदर्भात शिकवणे ४६

* इतरांचा विचार करणे * धर्मकार्याची तळमळ * प्रेमभाव ४६

१ ऐ. शिष्यत्वाविषयी शिकवणे – डॉ. आठवले यांनी गुरूंना व्यावहारिक गोष्टींविषयी कधीही न विचारणे ६१

१ ओ. सेवांच्या संदर्भात शिकवणे – सेवा परिपूर्ण करण्यास शिकवणे ६२

१ औ. साधकांमध्ये स्वसंरक्षण प्रशिक्षणाचे गांभीर्य निर्माण करण्यासाठी प्रशिक्षणाचे काही प्रकार स्वतः करणे ६२

१ अं. ‘आपत्काळाला सामोरे जाण्याची सिद्धता कशी करायची ?’, हे शिकवणे ६३

**प्रकरण २. सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचे सूक्ष्मातून शिकवणे ६४**

२ इ. साधकांना स्वभावदोष आणि अहं यांच्या निर्मूलनाविषयी मार्गदर्शन करणे ६६

२ ई. साधकाला लोखंडी मांडणी (रॅक) बनवण्याच्या सेवेविषयी मार्गदर्शन करणे ७३

२ उ. साधकांना भावाच्या संदर्भात मार्गदर्शन करणे ७४

२ ऊ. परात्पर गुरु डॉक्टरांनी दैनिक ‘सनातन प्रभात’च्या वाचकाला स्वप्नात दर्शन देऊन योग्य नामजप करण्याविषयी सांगणे ७६

२ ए. प.पू. डॉक्टरांनी सूक्ष्मातून साधकांना विविध विषयांच्या संदर्भात शिकवणे ७६

२ ऐ. साधिकेच्या मृत्यूनंतर तिच्या सूक्ष्म देहाला पुढील टप्प्याच्या साधनेविषयी मार्गदर्शन करणे ७७

**प्रकरण ३. सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या शिकवणीचे साधकांना झालेले लाभ ७९**

३ आ. परात्पर गुरु डॉक्टरांची शिकवण साधकांना व्यावहारिक जीवनात उपयोगी ठरणे ७९

३ इ. साधकांकडून स्वभावदोष आणि अहं यांच्या निर्मूलनासाठी प्रयत्न होणे ८२

* परात्पर गुरु डॉक्टरांनी सांगितल्याप्रमाणे साधिकेने तिच्यातील 'शिकवण्याची वृत्ती' हा अहंचा पैलू दूर होण्यासाठी प्रयत्न केल्यावर तिचा अहं आणि आध्यात्मिक त्रास न्यून होणे ८५

३ ई. साधकांना कोणतीही परिस्थिती आनंदाने स्वीकारता येणे ८८

३ उ. साधकांमधील गुण वाढणे ८८

३ ऊ. साधकांकडून भावाच्या स्तरावर कृती होणे – साधिकेने परदेशातील घरालाही आश्रम बनवणे ९४

३ ए. साधकांची साधना आणि सेवा यांत वाढ होणे ९६

३ ऐ. परात्पर गुरु डॉक्टरांच्या मार्गदर्शनामुळे वाईट शक्तींचा तीव्र त्रास असलेल्या साधिकेला झालेले लाभ ९८

३ ओ. परात्पर गुरु डॉक्टरांच्या दिव्य शिकवणीची फलश्रुती – अल्प कालावधीत अनेक साधक उन्नत आणि संत बनणे १०५

३ औ. सनातनच्या ज्ञानप्राप्तकर्त्या श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ यांना सूक्ष्मातून मिळालेले ईश्वरी ज्ञान ! १०७

३ औ १. परात्पर गुरु डॉक्टरांनी कृपासदृश प्रदान केलेल्या आध्यात्मिक शिक्षणाचे साधकांना झालेले लाभ १०७

* साधकांकडून कौटुंबिक मायेचा त्याग होऊन त्यांच्यात राष्ट्राप्रती प्रेम निर्माण होणे १०८

* 'कितीही संकटे आली, तरी ध्येयापासून ढळायचे नाही', अशी तत्त्वस्वरूप परिपक्वता साधकांत निर्माण होणे १०९

३ औ ३. साधकांनी चळवळी 'साधना' म्हणून राबवल्याने त्यांना यश प्राप्त होऊन समाजात सकारात्मक पालट होणे आणि त्यातून साधकांचीही आध्यात्मिक प्रगती होणे १११

卐 संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य माहिती ११३

# मनोगत

'परीस लोखंडाला सुवर्णत्व देऊ शकतो; पण परीसत्व नाही. याउलट गुरु शिष्यावर कृपा करून त्याला स्वतःचे गुरुत्वच देतात ! गुरुकृपा होण्यासाठी गुरूंची शिकवण मात्र सतत आचरणात आणावी लागते. सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले या महान गुरूंची शिकवण आचरणात आणल्यामुळे आजपर्यंत (१८.१०.२०२३ पर्यंत) अवघ्या ३३ वर्षांत सनातनचे १२७ साधक संत बनले आहेत, तर १०४६ साधक लवकरच संत बनण्याच्या मार्गावर आहेत ! यावरून सच्चिदानंद परब्रह्म डॉक्टरांच्या गुरुत्वाची थोरवी लक्षात येते. अशा महान गुरूंची शिकवणही किती महान असेल ?

सच्चिदानंद परब्रह्म डॉक्टर म्हणजे, ज्ञानाचा मेरूपर्वत आणि गुणांचा महासागर ! त्यामुळे त्यांच्या शिकवणीची उंची आणि खोली यांचा सहजासहजी थांग लागत नाही. ते शब्दांतून तर अध्यात्म शिकवतातच; पण त्यांचे नित्य सहज आचरणही साधनेचे विविधांगी दृष्टीकोन देणारे आणि इतके आदर्श आहे की, त्यांच्या सहवासात आलेला प्रत्येकच जण पुष्कळ काही शिकून जातो. त्यांचे आचरण पाहून आपल्यालाही 'योग्य आणि परिपूर्ण कृती कशी करावी ?', हे कळते. आपण 'शब्दांतून जे शिकतो', त्यापेक्षा 'कृतीतून जे शिकतो', ते आपल्या अधिक स्मरणातही रहाते. या दृष्टीने या ग्रंथात दिलेले साधकांचे अनुभव मौलिक आहेत.

सच्चिदानंद परब्रह्म डॉक्टर सूक्ष्मातूनही साधकांना विविध प्रकारे कसे शिकवतात, हेही या ग्रंथात दिले आहे. हे वाचून 'कोणतीही प्रतिकूल परिस्थिती असली अन् सच्चिदानंद परब्रह्म डॉक्टर स्थुलातून आपल्या जवळ नसले, तरी ते सूक्ष्मातून आपल्या सोबत असून आपल्याला योग्य साधनेची दिशा देणारच आहेत', ही साधकांची श्रद्धा वाढायलाही साहाय्य होईल.

सच्चिदानंद परब्रह्म डॉक्टर साक्षात् चैतन्यमूर्ती असल्याने त्यांचे शिकवणेही चैतन्याच्या स्तरावरील आहे. त्यामुळेच त्यांची शिकवण साधकांच्या अंतर्मनापर्यंत पोचून ती सहजपणे साधकांच्या आचरणात येते,


तसेच अनेक वर्षांनीही प्रसंगानुरूप ती शिकवण साधकांना आठवते ! त्यांच्या शिकवणीचे हे एक आगळे वैशिष्ट्यच आहे. त्यांच्या शिकवणीचे साधकांना झालेले विविध लाभही ग्रंथात दिले आहेत.

सच्चिदानंद परब्रह्म डॉक्टरांकडून अनेक जण अनेक प्रकारे शिकले आहेत आणि शिकतही आहेत. काही साधकांनी त्यांना शिकायला मिळालेली सूत्रे लिहून दिली. त्या सूत्रांच्या आधारे हा ग्रंथ सिद्ध केला आहे. अनेक साधक वेळोवेळी त्यांना शिकायला मिळालेली सूत्रे लिहून देतच असतात. त्यामुळे सच्चिदानंद परब्रह्म डॉक्टरांच्या शिकवणीच्या ग्रंथांच्या पुढे आवृत्त्यांवर आवृत्त्या निघणार आहेत.

'सच्चिदानंद परब्रह्म डॉक्टरांची शिकवण सर्वांनी आचरणात आणून चांगली साधना करून शीघ्र आध्यात्मिक उन्नती करून घेतली, तर या ग्रंथाचे खऱ्या अर्थाने सार्थक होईल. असे लवकर होवो', ही श्री गुरुचरणी मनोभावे प्रार्थना !' – **(पू.) संदीप आळशी** (६.९.२०२३) F (DrTe-KrSu + SStSA-L)

## 'सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांची अनमोल शिकवण' या ग्रंथमालिकेतील पहिला खंड !

### साधना प्रत्यक्ष शिकवण्याच्या पद्धती



सहज बोलण्यातून शिकवणे

सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांची शिकवण कळायला सोपी आणि कृतीच्या स्तरावर साधनेविषयी मार्गदर्शन करणारी असल्याने सहजपणे आचरणात आणता येते. 'सच्चिदानंद परब्रह्म डॉक्टर साधकांना सहज बोलण्यातून, पत्रलेखनातून, तसेच साधकांना त्यांच्या चुका दाखवून कसे शिकवतात ?', यांविषयी माहिती देणारा हा ग्रंथ साधकांना त्यांच्या साधनेच्या वाटचालीत निश्चितच मार्गदर्शक ठरेल !